**प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत भागीदारी तत्वावर परवडणारी घरे(AHP) (SLS Code-MH 676) अंतर्गत सर्वसाधारण घटकांसाठी (Other than SC/ST Component) केंद्र हिश्श्याचा व समरुप राज्य हिश्श्याचा निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**गृहनिर्माण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : प्रआयो-२०२६/प्र.क्र.११०/गृनिधो-२**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २० मे, २०२६.

<u>वाचा :-</u>

१.गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय, केंद्र शासन यांचे मंजूरी आदेश क्रमांक : N-11012/6/2024-HFA-IV-MoHUA (EFS-9171348), dt.16.04.2026.

२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०२६ /प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६

३. गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्रमांक प्रआयो-२०२५/प्र.क्र. २१५/गृनिधो-२, दिनांक २७.०२.२०२६ .

<u>**प्रस्तावना :**</u>

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या योजनेअंतर्गत केंद्र शासनाने सन २०२५-२६ मध्ये SNA-SPARSH या प्रणालीअंतर्गत भागीदारी तत्वावरील परवडणारी घरे (AHP) या घटकासाठी (SLS Code-MH 676) सर्वसाधारण प्रवर्गाकरीता (Other than SC/ST Component) रुपये २४६६२.५७३६० लक्ष इतका निधी मंजूर (Mother Sanction) केला होता. सदर निधी अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्यासाठी वाचा क्रमांक ३ येथील दिनांक २७.०२.२०२६ च्या शासन निर्णयान्वये म्हाडा प्राधिकरणास वितरीत करण्यात आला होता.

दिनांक ३१.०३.२०२६ पर्यंत उपरोक्त निधीपैकी रुपये ११४३९.२४ लक्ष इतकाच निधी खर्च झाल्यामुळे केंद्र शासनाने वाचा क्रमांक १ येथील दिनांक १६.०४.२०२६ च्या आदेशान्वये उर्वरित रुपये १३२२३.३३३६० लक्ष इतका निधी मंजूर (Mother Sanction) केला आहे. सदर निधी व त्याच्या समरुप राज्य हिश्याचा रुपये ८८१५.५५५७४ लक्ष इतका निधी SNA-SPARSH प्रणांली अंतर्गत वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय-:**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत भागीदारी तत्वावरील परवडणारी घरे (AHP) (SLS Code-MH 676) सर्वसाधारण घटकांसाठी (Other than SC/ST Component) केंद्र शासनाने मंजूर केलेल्या मातृ मंजूरीच्या (Mother Sanction) मर्यादेत केंद्र हिश्यापोटी रुपये १३२२३.३३३६० लक्ष (अक्षरात रुपये एकशे बत्तीस कोटी तेवीस लक्ष तेहतीस हजार तीनशे साठ फक्त) व राज्य हिश्यापोटी रुपये ८८१५.५५५७४ लक्ष (अक्षरात रुपये अठ्ठ्याऐंशी कोटी पंधरा लक्ष पंचावन्न हजार पाचशे चौऱ्याहत्तर फक्त) असा एकूण रुपये २२०३८.८८९३४ लक्ष (अक्षरात रुपये दोनशे वीस कोटी अडतीस लक्ष अठ्ठ्याऐंशी हजार नऊशे चौत्तीस फक्त) इतका निधी वितरीत करण्यास यान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. केंद्र हिश्यापोटीचा रुपये १३२२३.३३३६० लक्ष इतका निधी मागणी क्रमांक Q-३, मुख्य लेखाशिर्ष २२१६, गृहनिर्माण, (०८) (०५) सर्वांसाठी गृहनिर्माण अंतर्गत भागीदारी तत्वावरील परवडणारी घरे (प्र.म.आ.यो) (शहरी) (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम), ३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान, लेखाशिर्ष २२१६३७७८ अंतर्गत वितरीत करण्यात येत आहे.

३. राज्य हिश्यापोटीचा रुपये ८८१५.५५५७४ लक्ष इतका निधी मागणी क्रमांक Q-३, मुख्य लेखाशिर्ष २२१६, गृहनिर्माण, (०८) (०६) सर्वांसाठी गृहनिर्माण अंतर्गत भागीदारी तत्वावरील परवडणारी घरे (प्र.म.आ.यो) (शहरी) (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम), ३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान, लेखाशिर्ष २२१६३७८७ अंतर्गत वितरीत करण्यात येत आहे.

४. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत सुकाणू अभिकरण म्हाडा प्राधिकरण असून आहरण व संवितरण अधिकारी हे वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (DDO No. 8101710009) आहेत.

५. सदर निधी खर्च करताना विहित कार्यपध्दती अनुसरुन तसेच शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.

६. हे आदेश वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०२६ /प्र.क्र.४०/अर्थ-३,दिनांक ०७.०५.२०२६ मधील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५२०११५५१९३५०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PHIRANGE NITIN
RAGHUNATH

Digitally signed by PHIRANGE NITIN RAGHUNATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOUSING DEPARTMENT,
2.5.4.20=edb67d4776bf9bdb10539891848bf113937cdf1adfca7bf1e9cac22215940c14,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2B60EEA8BE04A132B62B97355616E6FF0326DC7DC810ECA40666D631BE1AC
A07, cn=PHIRANGE NITIN RAGHUNATH
Date: 2026.05.20 11:56:30 +05'30'

**(नितीन फिरंगे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

२. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई.
३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
४. सर्व अमंलबजावणी यंत्रणा, महाराष्ट्र राज्य.
५. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर.
६. संबंधित आयुक्त, महानगरपालिका / संबंधित मुख्य अधिकारी, म्हाडा मंडळे (मुंबई, कोंकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर) / संबंधित मुख्याधिकारी / नगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत.
७. संगणकीय कोषागार अधिकारी, सायबर कोषागरे.
८. सर्व कोषागरे अधिकारी.
९. सह सचिव (व्यय-३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०.सह संचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई
११.वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,मुंबई.
१२.राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन यंत्रणा (PMU), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३.कार्यासन अधिकारी, अर्थ व लेखा, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१४.निवडनस्ती /गृनिधो-२ कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.